# लोक महाविद्यालय वर्धा

## नमुना प्रश्नपत्रिका

### विषय :- राज्यशास्त्र ( पाश्चात्य राजकीय विचार)

### वर्ग :- बी. ए. भाग -१ ( सेमिस्टर-II)

वेळ ३ तास                                                                 गुण : ८०

---

सुवना :- १) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.
२) सर्व प्रश्नांना समान गूण आहेत.

प्र. १ला प्लेटोच्या आदर्श राज्याचे वर्णन करा.

किंवा

प्लेटोचा साम्यवाद सांगून तो आधुनिक साम्यवादापेक्षा कसा भिन्न आहे?

प्र . २रा मार्क्सच्या वर्गसंघर्ष सिध्दांताचे टीकात्मक परिक्षण करा

किंवा

"अतिरिक्त मूल्य म्हणजे कामगारांचे नग्न, निर्लज्ज व अमानवीय शोषण होय" या विधानाची साधक - बाधक चर्चा करा.

प्र. ३रा खालील प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा.

अ) ॲरिस्टॉटलने सांगितलेली क्रांतीची सामान्य कारणे लिहा.

ब) "ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण केले नसून शासनाचे वर्गीकरण केले आहे" भाष्य करा.

किंवा

१) लोकतंत्र आणि समूहतंत्रात क्रांती टाळण्याचे कोणते उपाय ॲरिस्टॉटलने सांगितले?

२) ॲरिस्टॉटलने कोणत्या आधारावर गुलामगिरीचे समर्थन केले?

प्र. ४था खालील प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा.

अ) मिलने मतदानाच्या अधिकाराचे महत्व कसे स्पष्ट केले ?

ब) मिलचे संपत्तीविषयक विचार स्पष्ट करा

किंवा

१) मिलच्या मते प्रतिनिधी आणि प्रतिनिधी सभेचे कार्यक्षेत्र कोणते ?

२) मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारावरील टीका लिहा.

प्र. ५वा योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) प्लेटोचा जन्म ———————— या प्रसिध्द ग्रीक नगरराज्यात झाला.
अ) अथेन्स ब) स्पार्टा क) मेगारा ड) ॲरगॉस

२) न्यायाची व्याख्या करणारा ———————— हा प्लेटोचा ग्रंथ महत्वाचा मानला जातो.
अ) दि लॉज ब) दि स्टेट्समन क) दि रिपब्लिक ड) प्रोटोगोरस

३) ॲरिस्टॉटलने एका व्यक्तीच्या शुध्द शासन प्रकाराला ———————— म्हटले आहे.
अ) कुलीनतंत्र ब) एकतंत्र क) धनिकतंत्र ड) राजतंत्र

४) राज्यशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा प्राप्त करुन देण्याचे श्रेय ———————— ला दिले जाते.
अ) प्लेटो ब) ॲरिस्टॉटल क) साक्रेटिस ड) रुसो

५) सुप्रसिध्द राज्यशास्त्रज्ञ सी. एल. वेपरने ———————— चे " असंतुष्ट लोकशाहीवादी" म्हणून मूल्यांकन केले.
अ)व्हॉब्ज ब) कार्ल मार्क्स क) मिल ड) लॉक

६) मिलच्या मते व्यक्ती जीवनाचे ———————— हे दोन पैलू असतात.

अ) व्यक्तिगत आणि सामाजिक ब) व्यक्तिगत आणि आर्थिक क) आर्थिक आणि राजकीय ड) राजकीय आणि सामाजिक

७) "मानवाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे" असे ———— ने प्रतिपादन केले आहे.

अ) मिल ब) मार्क्स क) हेगले ड) प्लेटो

८) ——————— हा मार्क्सवादी तत्वज्ञानाचा प्रमुख आधार आहे.

अ) व्यक्तिवाद ब) समाजवाद क) द्वंदवाद ड) उदारवाद

.........................................................................................